Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष १२, अंक २३ ] गुरुवार, ऑगस्ट १३, २०२६/श्रावण २२, शके १९४८ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ६२.००

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

# भाग एक—अ-अमरावती विभागीय पुरवणी

**(भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.**

भाग १-अ (असा.) (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ७८.

**मुख्याधिकारी, नगर परिषद, यांजकडून**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये विकास योजना वणी (मुळ हद्द दुसरी सुधारित) मधील किरकोळ फेरबदलाबाबत**

**जाहिर सूचना**

क्रमांक नपव-नि.व-८२०-२०२६.—

वणी शहराची मुळ हद्दीची विकास योजना (दु.सु.) महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग अधिसूचना क्रमांक टी.पी.एस.-२७१८-१३९४-प्र.क्र.११६-२०१८-नवी-३०, दिनांक ०८ मार्च, २०१९ अन्वये मंजूर झालेली असून ही विकास योजना दिनांक ०३ मे, २०१९ पासून अंमलात आली आहे.

वणी शहराच्या विकासाच्या दृष्टीकोनातून मंजूर विकास योजनेमध्ये खालील प्रमाणे किरकोळ बदल करणे गरजेचे आहे.

मंजूर विकास योजना वणी (मु.ह.दु.सु.) तील मौजा वणी सर्व्हे नंबर १०६ मधील, निरगुडा नदीलगत आरक्षण क्रमांक ५६ बगीचा (Garden) करिता आरक्षित आहे. या आरक्षणाचे प्रयोजन बदलवून मलनिस्सारण प्रक्रिया प्रकल्प (Sewage Treatment Plant) करिता आरक्षित करावयाचे आहे.

त्यानुसार, नगर परिषद वणी यांनी दिनांक १३ जुलै, २०२६ रोजी सर्व साधारण सभेचे आयोजन करुन ठराव क्रमांक ०७ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१) नुसार मंजूर विकास योजना वणी (मु.ह.दु.सु.) मध्ये किरकोळ फेरबदल करावयाचे ठराव मंजूर केला आहे. त्याबाबतचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

**अनुसूची**

| अ.क्र. | मौजा | भूमापन क्रमांक/ सर्व्हे क्रमांक | विकास योजनेतील अनुज्ञेय वापर | प्रस्तावित नियोजित वापर |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | वणी | १०६ | आरक्षण क्रमांक ५६, बगीचा (Garden) | आरक्षण क्रमांक ५६, मलनिस्सारण प्रक्रिया प्रकल्प (Sewage Treatment Plant) |

उपरोक्त फेरबदल दर्शवणारा विकास योजनेचा भाग नकाशा व त्यासंबंधी अहवाल जो मुख्याधिकारी, नगर परिषद, वणी यांनी स्वाक्षरी केलेला आहे तो नगर परिषद, वणी कार्यालयात कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनार्थ उपलब्ध आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये सूचित करण्यात येते की, नियोजित फेरबदलासंबंधित कोणाला काही आक्षेप अथवा सूचना असतील तर त्यांनी ही अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत मुख्याधिकारी, नगर परिषद, वणी यांच्याकडे लेखी स्वरुपात सादर करावे.

विहीत मुदतीत प्राप्त होणाऱ्या आक्षेप व सूचना नगर परिषद, वणी यांच्याव्दारे शासनास अंतिम मंजुरीकरिता प्रस्ताव सादर करण्यापूर्वी विचारात घेतल्या जातील जेणे करुन फेरबदलाचा प्रस्ताव (कोणत्याही सुधारणा असल्यास त्यासह) मंजुरीसाठी राज्य शासनाकडे सादर करता येईल.

विहीत मुदतीत कोणताही आक्षेप अथवा सूचना प्राप्त न झाल्यास प्राथमिक ठराव हा अंतिम समजून पुढील कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल.

**सचिन शं. गाडे,**
मुख्याधिकारी,
नगर परिषद, वणी.

वणी :
दिनांक १० ऑगस्ट, २०२६.

-----------

भाग १-अ (असा.) (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ७९.

BY CHIEF OFFICER, MUNICIPAL COUNCIL

**Regarding Minor modification under section 37 (*1*) of Maharashtra Regional and Town Planing Act, 1966 in Developement Plan of Wani (Original Limit IInd Rev.)**

*NOTICE*

No. NPW-NI.VI-821-2026.-

The Development Plan of Wani Town (Original limit IInd Rev.) has been prepared by Municipal Council, Wani with reference to provision of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 and it has been sanctioned by Urban Development Department, Government of Maharashtra *vide* resolution No. TPS-2718-1394-CR-116-2018-UD-30, Dated 08th March, 2019 it has come into force with effect form 03rd May, 2019.

The Minor modification is necessary for development of Wani Town.

As per sanctioned Development Plan of Wani (Original limit IInd Rev.) the proposed Reservation No. 56 in Survey No. 106 situated along Nirguda is reserved for Garden which has area 3H.48R with reference to Section 37 (*1*) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 purpose of Reservation No. 56 is changed and to be reserved for Sewage Treatment Plant (S.T.P).

Municipal Council, Wani *vide* General Meeting Resolution No. 07 Dated 13th July, 2026 has therefore decided to make aforesaid Minor modification with reference to Section 37 (*1*) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 as mentioned below.

SCHEDULE

| Sr. No. | Mouza | Survey No. | Use of Land under Development Plan | Proposed Land use |
|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) |
| 1 | Wani | 106 | Reservation No. 56 (Garden) | Reservation No. 56, Sewage Treatment Plant (S.T.P) |

The part plan of Development Plan of Wani under modification and report there of duly signed and dated by Chief Officer, Municipal Council, Wani is kept ready for public inspection during office hour in the office of Municipal Council, Wani on all working days.

Whereas, in pursuance of Section 37(*1*) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 is hereby notified that any person having objection and suggestion in regarding to propose modification may communicate in writing to Chief Officer, Municipal Council, Wani within 30 (Thirty) days from the date of publication of notice in *Maharashtra government official gazette.*

The suggestions, objections received within the above mentioned period shall be considered by the Municipal Council, Wani before submitting the proposal of final minor modification to government for sanction.

Within above mentioned period if Municipal Council, Wani did not get any objection and suggestion then above mentioned resolution will be considered as final and according to this futher action will be taken.

SACHIN S. GADE,
Chief Officer,
Municipal Council, Wani.

Wani :
Dated the 10th August, 2026.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.